Lyceum India Journal of Social Sciences || ISSN (Online): 3048-6513
Volume: 3 Issue: 3 || February 2026 (Special Issue 1) || DOI: 10.5281/zenodo.18844611

# ग्रामीण स्थलांतर नागरीकरण आणि समाजरचना

**Bhagwat D. Gore**[1]

**गोषवारा**

अन्न, वस्त्र,निवारा,आरोग्य आणि शिक्षण या मूलभूत गरजा असून त्या पूर्ण करण्याच्या शोधात माणूस एका ठिकाणावरून दुसऱ्या ठिकाणी जात असतो.पृथ्वीवरील सर्व प्राणी व पक्ष्यांसह जवळजवळ सर्वच जीव असे परिभ्रमण करत आपले पोट भरत असतात. भारत हा खेड्याचा देश म्हणून ओळखला जातो. भारतामध्ये 6 लाखापेक्षा अधिक खेडे असून ग्रामीण भागात अनेकदा शिक्षणाच्या अपुऱ्या सुविधा, आरोग्य सुविधांचा अभाव, रोजगाराच्या संधीची कमतरता आणि इतर घटकांसारख्या मूलभूत गरजांची कमतरता दिसते. ग्रामीण भागात गरीब लोकांचे कामासाठी स्थलांतर होते यामुळे शहरात लोकसंख्या वाढते त्यामुळे तेथे अनेक समस्या निर्माण होतात. उद्योग, व्यवसाय, शिक्षण आणि आरोग्य सुविधांमुळे ग्रामीण जीवनशैलीकडून शहरी जीवनशैलीकडे स्थलांतर होते. ग्रामीण स्थलांतर आणि नागरीकरण हे एकमेकांशी घट्ट जोडलेले असून, चांगल्या रोजगाराच्या संधी, शिक्षण आणि नैसर्गिक आपत्ती तसेच आरोग्य सुविधांच्या शोधात ग्रामीण भागातून लोक शहराकडे स्थलांतरित होतात ग्रामीण भागातून लोक शहराकडे स्थलांतरित होतात. या प्रक्रियेमुळे शहरी लोकसंख्येचा घनता वाढते आणि शहरांचा विस्तार होतो, परिणामी पायाभूत सुविधांवर ताण येऊन झोपडपट्ट्या व प्रदूषणासारख्या समस्या निर्माण होतात. सदरील संशोधन करण्यासाठी संशोधकाने पुस्तके. वर्तमान पत्रे,वेब साईट इ. दुय्यम साधनसामग्रीचा आधार घेतला आहे.

**प्रस्तावना**

मानवाच्या अन्न, वस्त्र,निवारा,आरोग्य आणि शिक्षण या मूलभूत गरजा असून त्या पूर्ण करण्याच्या शोधात माणूस एका ठिकाणावरून दुसऱ्या ठिकाणी जात असतो.पृथ्वीवरील सर्व प्राणी व पक्ष्यांसह जवळजवळ सर्वच जीव असे पृथ्वीवर परिभ्रमण करत असतात.ते सर्व आपल्याला आरामदायक जीवन जगण्यासाठी पर्यावरणीय अनुकूल परिस्थिती असलेल्या चांगल्या ठिकाणी स्थायिक होण्यासाठी एका ठिकाणावरून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतर करतात. मानवाचे हे स्थलांतर सामान्यतः ग्रामीण भागातून शहरी भागाकडे होते.नेहमीच मानव आपल्या चांगला व्यवसाय आणि नोकरीच्या संधीं शोधत असतो, की ज्याच्यामुळे त्याला व त्याच्या कुटुंबाला प्रतिष्ठित व आरामदायक जीवन जगण्यास आणि राहणीमानात वाढ करण्यास मदत होईल.स्थलांतर म्हणजे व्यक्ती चांगल्या संधी आणि चांगल्या जीवनाच्या शोधात स्वतः किंवा त्याच्या कुटुंबांचे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाणे. भारत हा खेड्याचा देश म्हणून ओळखला जातो. भारतामध्ये 6 लाखापेक्षा अधिक खेडे असून ग्रामीण भागात अनेकदा शिक्षणाच्या अपुऱ्या सुविधा, आरोग्य सुविधांचा

[1] Model College, Ghansawangi.Dist-Jalna

अभाव, रोजगाराच्या संधीची कमतरता आणि इतर घटकांसारख्या मूलभूत गरजांची कमतरता दिसते.तर दुसरीकडे,शहरी भागांमध्ये व्यसायासाठी नोकऱ्यांसाठी भरपूर संधी उपलब्ध असतात आणि आरोग्य सुविधा रोजगाराच्या संधी तसेच एक सभ्य जीवनशैली मिळते असे मानले जाते. ग्रामीण भागातून शहरी भागाकडे होणाऱ्या स्थलांतरामुळे शहरातील लोकसंख्येची घनता वाढते आणि ग्रामीण लोकसंख्या कमी होते. जेव्हा लोकांना असे वाटते की मोठे शहर त्यांना अधिक अर्थपूर्ण जीवन जगण्यास मदत करू शकते, तेव्हाच लोक त्यांच्या राहण्याच्या ठिकाणाहून स्थलांतर करतात. लोकांना गावांमधून बाहेर पडण्यास भाग पाडणाऱ्या घटकांमध्ये गरिबी, गावातील वादविवाद आणि मूलभूत सुविधांचा अभाव यांचा समावेश होतो. लोकांना शहरांकडे आकर्षित करणाऱ्या घटकांमध्ये अधिक रोजगाराच्या संधी, जास्त वेतन आणि चांगल्या राहणीमानाचा समावेश होतो.ग्रामीण ते नागरी स्थलांतर वेगाने होत असून, २०२३-२४ च्या आर्थिक सर्वेक्षणानुसार, २०३० पर्यंत देशातील ४०% पेक्षा जास्त लोकसंख्या शहरी भागात राहण्याची शक्यता आहे. २०२१ च्या आकडेवारीनुसार, सुमारे १८.९% स्थलांतर ग्रामीण ते नागरी क्षेत्रात होते, तर महाराष्ट्रात नागरीकरणाचे प्रमाण ४५.२३% इतके आहे

**ग्रामीण स्थलांतर**

ग्रामीण भागातील आपले मूळ निवास स्थान सोडून नवीन ठिकाणी निवासाच्या जागी व्यक्ती किंवा समूहाने जाणे म्हणजे स्थलांतर होय. आपले निवासी भाग सोडून, तात्पुरत्या किंवा कायमस्वरूपी स्वरूपात, दुसऱ्या भौगोलिक ठिकाणी (देशांतर्गत किंवा आंतरराष्ट्रीय सीमा ओलांडून) राहण्यासाठी किंवा काम करण्यासाठी जाणे होय. व्यक्तीचे हे जाणे शिक्षण, रोजगार, आरोग्य, किंवा नैसर्गिक आपत्ती यांसारख्या सामाजिक, आर्थिक व पर्यावरणीय कारणांमुळे घडते.

ग्रामीण स्थलांतर म्हणजे नवीन रोजगाराच्या ,व्यवसायाच्या शोधात,चांगल्या जीवनमानासाठी किंवा शिक्षणासाठी ग्रामीण भागातून शहरी किंवा इतर विकसित भागात होणारे लोकांचे स्थलांतर . हे स्थलांतर प्रामुख्याने शेतीतील कमी उत्पन्न, ग्रामीण भागात रोजगाराची कमतरता आणि शहरांमधील सुविधांमुळे(उदा. व्यवसाय,शिक्षण, आरोग्य) असते. परिणामी या प्रक्रियेमुळे शहरांमध्ये लोकसंख्येची घनता वाढ, घराची समस्या, रस्त्याची समस्या आणि ग्रामीण भागात कष्टाळू हातांची कमतरता भासते. ग्रामीण भागात गरीब लोकांचे कामासाठी स्थलांतर होते.

**संशोधनाची उद्दिष्टे**

1. ग्रामीण स्थलांतर म्हणजे काय ते समजून घेणे.
2. नागरीकरण ही संकल्पना समजून घेणे.

**संशोधन पध्दती**

सदरील संशोधन करण्यासाठी संशोधकाने दुय्यम साधनसामग्रीचा आधार घेतला आहे.त्यात पुस्तके. वर्तमान पत्रे,वेब साईट यांचा समावेश होतो.

लोकांनी पाहिले आहे की चांगल्या रोजगाराच्या संधी मोठ्या प्रमाणावरील शेतीने आधुनिक शेतीची जागा घेतली आहे. यामुळे बेरोजगारीची पोकळी निर्माण झाली आहे आणि औद्योगिक क्षेत्रातील प्रचंड वाढ लोकांना रोजगाराच्या शोधात ग्रामीण भागातून शहरी भागात आणते. शहरी भागातील सरासरी वेतन सामान्यतः ग्रामीण भागातील सरासरी वेतनापेक्षा जास्त असते. शेतीमध्ये असलेल्या कठोर शारीरिक श्रमामुळे आणि तुलनेने कमी वेतनामुळे ग्रामीण भाग बेरोजगारीच्या समस्येचा सामना करत आहेत.

**स्थलांतराचे प्रमुख प्रकार**

**अंतर्गत /आंतरिक स्थलांतर :** आंतरिक स्थलांतर म्हणजे देशात किंवा राज्यात एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी लोकांचे स्थलांतर. उदा- बिहारमधील एका गावातून पुण्याला झालेले स्थलांतर हे अंतर्गत स्थलांतर मानले जाईल. अंतर्गत स्थलांतराचे पुढील दोन प्रकारांमध्ये वर्गीकरण केले जाऊ शकते.देशाच्या सीमांतर्गत, उदा - ग्रामीण भागातून शहरी भागात होणारे स्थलांतर.आंतरराज्यीय स्थलांतर - एकाच राज्यातील एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी होणारे स्थलांतर.

**आंतरराष्ट्रीय स्थलांतर :** एका देशातून दुसऱ्या देशात होणारे स्थलांतर उदा - भारतातून जपानमध्ये जाणे.बाह्य स्थलांतर म्हणजे जेव्हा लोक देशाबाहेरील एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जातात. उदाहरणार्थ, भारतातून कॅनडामध्ये झालेले स्थलांतर बाह्य स्थलांतराच्या श्रेणीत येते.

**हंगामी स्थलांतर :** एका ठराविक काळासाठी, जसे की ऊस तोडणीसाठी एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशात होणारे स्थलांतर.

**कायमस्वरूपी स्थलांतर:** लोक कायमचे शहरात जाऊन राहतात.

**तात्पुरते/हंगामी:** शेतीचा हंगाम संपल्यावर रोजगारासाठी स्थलांतर करतात जे बऱ्याचदा परततात.

**स्थलांतराचे प्रमुख कारणे** (पुश आणि पुल घटक) व्यक्तीला चांगले जीवनमान, नोकरीची व व्यवसायाची संधी (पुल), किंवा गरिबी, युद्ध, दुष्काळ नैसर्गिक आपत्ती (पुश) ही मुख्य कारणे असतात.

**ग्रामीण स्थलांतराची प्रमुख कारणे:**

**आर्थिक कारणे:** ग्रामीण भागात शेती व्यवसाय पावसावर अवलंबून असल्याने आणि नियमित रोजगाराच्या अभावामुळे, लोक उत्पन्नाच्या अधिक शोधासाठी शहरांकडे वळतात.

**सामाजिक आणि पायाभूत सुविधांचा अभाव:** आरोग्यसेवा, उच्च दर्जाचे शिक्षण आणि इतर सोयी-सुविधांची ग्रामीण भागात कमतरता दिसते.

**जीवनशैली:** शहरी जीवनाचे आकर्षण, चांगल्या राहणीमानाची इच्छा आणि आधुनिक सुविधा.

**नैसर्गिक आपत्ती:** दुष्काळ, पूर, भूकंप किंवा ज्वालामुखी सारख्या आपत्तींमुळे शेतातील पिक नष्ट होणे आणि उपजीविकेसाठी स्थलांतर करणे.

**स्थलांतराचे परिणाम:**

शहरी भागावर परिणाम: शहरांमध्ये लोकसंख्येची वाढ, झोपडपट्टी (Slums) आणि पायाभूत सुविधांवर (पाणी, रस्ते, वीज, वाहतूक) प्रचंड ताण येतो.

ग्रामीण भागावर परिणाम: लोकसंख्येचे असंतुलन निर्माण होते ते प्रामुख्याने तरुण पुरुष वर्ग शहरात गेल्यामुळे ग्रामीण भागात शेतीसाठी कामगारांची कमतरता भासते.

**सामाजिक बदल:** कुटुंब आणि ग्रामीण समाजाच्या रचनेवर परिणाम करते. स्थलांतरामुळे मूळ ठिकाण आणि नवीन ठिकाण या दोन्ही ठिकाणी सकारात्मक आणि नकारात्मक सामाजिक व आर्थिक बदल घडतात.

**नागरीकरण आणि ग्रामीण स्थलांतर महाराष्ट्रातील संदर्भ**

महाराष्ट्रात ग्रामीण भागातून मुंबई, पुणे, नागपूर,छत्रपती संभाजीनगर, नाशिक यांसारख्या मोठ्या शहरांमध्ये रोजगारासाठी, पुरुष वर्गाचे, मोठ्या प्रमाणावर स्थलांतर होत आहे .

**ग्रामीण-शहरी स्थलांतर**

ग्रामीण भागातून-शहरी भागात होणाऱ्या स्थलांतरामागे अनेक कारणे असू शकतात. आपण या घटनेला कारणीभूत ठरणारे घटक आणि ग्रामीण-शहरी स्थलांतराच्या विविध पैलूं अभ्यासणार आहोत.ग्रामीण भागातून शहरी भागाकडे होणाऱ्या स्थलांतराचा समाज, राहणीमान आणि पर्यावरणावर मोठा परिणाम होतो.

**नागरीकरण** - नागरीकरण (Urbanization) म्हणजे ग्रामीण भागातील लोकसंख्येचे शहरी भागात होणारे स्थलांतर आणि त्यामुळे शहरांच्या संख्येत व आकारमानात होणारी वाढ होय. ही एक अशी प्रक्रिया आहे, ज्यामध्ये उद्योग, व्यवसाय, शिक्षण आणि आरोग्य सुविधांमुळे ग्रामीण जीवनशैलीकडून शहरी जीवनशैलीकडे स्थलांतर होते. ग्रामीण स्थलांतर आणि नागरीकरण हे एकमेकांशी घट्ट जोडलेले असून, चांगल्या रोजगाराच्या संधी, शिक्षण आणि नैसर्गिक आपत्ती तसेच आरोग्य सुविधांच्या शोधात ग्रामीण भागातून लोक शहराकडे स्थलांतरित होतात. या प्रक्रियेमुळे शहरी

लोकसंख्येचा घनता वाढते आणि शहरांचा विस्तार होतो, परिणामी पायाभूत सुविधांवर ताण येऊन झोपडपट्ट्या व प्रदूषणासारख्या समस्या निर्माण होतात.

**नागरीकरणाची मुख्य कारणे**

- **रोजगाराची कमतरता:** ग्रामीण भागात शेतीवर अवलंबून असलेल्या महत्वाच्या रोजगाराची अस्थिरता .
- **सुविधांचा अभाव:** शिक्षण, उत्तम आरोग्य सुविधा आणि आधुनिक जीवनशैलीच्या शोधात शहराकडे जाणे.
- **औद्योगिकीकरण:** शहरांमध्ये उद्योग आणि व्यापाराच्या वाढत्या संधी.

**नागरीकरणाचे परिणाम व आव्हाने:**

- **पायाभूत सुविधांवर ताण:** शहरात पाणीपुरवठा, वीज आणि घरांची कमतरता.
- **झोपडपट्ट्यांची निर्मिती:** वाढत्या लोकसंख्येमुळे राहण्याच्या जागांचा तुटवडा.
- **पर्यावरणीय ऱ्हास:** प्रदूषण, वाहतुकीची कोंडी आणि कचऱ्याची समस्या.

**स्थलांतर रोखण्यासाठी उपाययोजना**

- **ग्रामीण औद्योगिकरण:** ग्रामीण भागात छोटे - मोठे उद्योग सुरु करून रोजगाराच्या संधी निर्माण करणे.
- **ग्रामीण सुविधांचा विकास:** खेड्यांमध्ये अधिक उत्तम शिक्षण, प्रवास आणि आरोग्य सेवा पुरवणे.
- **शहरांचे विकेंद्रीकरण:** नवीन शहरे वसवून त्यामध्ये रोजगाराच्या संधी शहराबाहेर निर्माण करणे.

अशा प्रकारे नागरीकरण ही एक नैसर्गिक प्रक्रिया असली, तरी ती सुनियोजित असावी लागते. महाराष्ट्रात मुंबई, पुणे, नागपूर,छत्रपती संभाजीनगर यांसारख्या महानगरांमध्ये हे प्रमाण अधिक आहे.

**नागरीकरणाची मुख्य वैशिष्ट्ये:**

- **ग्रामीण-शहरी स्थलांतर:** रोजगाराच्या शोधात लोक खेड्यांतून शहराकडे येतात.
- **औद्योगिकीकरण:** उद्योग आणि व्यवसायांचा विकास झाल्यामुळे शहरी भागात लोक एकवटतात.
- **सुविधांमध्ये वाढ:** शैक्षणिक संस्था, आरोग्य सेवा, आणि पायाभूत सुविधा (रस्ते, वीज) यामुळे शहरांचा विकास होतो.

- **जीवनशैलीत बदल:** कृषी व्यवसायाऐवजी बिगर-कृषी (सेवा व औद्योगिक) क्षेत्रावर आधारित जीवनपद्धती.

**नागरीकरणाचे परिणाम:**

- आर्थिक विकास, आधुनिक जीवनशैली आणि अधिक रोजगाराच्या संधी.
- लोकसंख्येची प्रचंड घनता, झोपडपट्ट्यांची वाढ, वाहतूक कोंडी, पाणीपुरवठा आणि स्वच्छतेचे प्रश्न.
- शहरांमध्ये चांगल्या आरोग्यसेवा आणि शैक्षणिक सेवा.
- चांगले प्रशासन आणि सुविधागावांमध्ये गरिबी, कर्ज, दुष्काळ आणि इतर कठीण परिस्थिती

आरोग्यसेवा आणि शैक्षणिक सेवा: ग्रामीण भागातून शहरी भागात स्थलांतर करताना, लोकांना अनेकदा रुग्णालये, दवाखाने आणि शैक्षणिक संस्थांसारख्या चांगल्या मूलभूत सेवा मिळतात. शहरी भागात सामान्यतः चांगली सार्वजनिक वाहतूक आणि इतर स्वच्छता व शिक्षण प्रणाली उपलब्ध असतात. या नियामक आणि मूलभूत गरजा शहरांमध्ये सहज परवडणाऱ्या असतात आणि ग्रामीण-शहरी स्थलांतराची गरज निर्माण करणाऱ्या सर्वात महत्त्वाच्या घटकांपैकी हा एक आहे.

चांगले प्रशासन आणि सुविधा: ग्रामीण भागातून शहरी भागाकडे झालेल्या स्थलांतराच्या आकडेवारीवरून असे दिसून आले आहे की, शहरांमध्ये चांगले प्रशासन आणि व्यवस्थापन मिळत असल्याने लोक शहरी भागात जातात. लोकांना चांगले जीवन देण्यासाठी शहरी भाग सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या सुव्यवस्थित असतात. पायाभूत सुविधा आणि वाहतूक सेवा अधिक संघटित आणि वारंवार उपलब्ध असतात आणि मनोरंजनासाठीही अधिक सुविधा असतात.

गावांमध्ये गरिबी, कर्ज, दुष्काळ आणि इतर कठीण परिस्थिती: शहरे आणि गावांमध्ये असमान विकासामुळे राहणीमानाच्या मूलभूत मानकांमध्ये फरक निर्माण होतो. रस्ते, पिण्याचे पाणी, वीज आणि इतर सुविधांच्या अभावामुळे गरीब गावांमध्ये जीवन कठीण होऊ शकते. गावांमध्ये पूर, दुष्काळ आणि कर्ज यामुळेही लोक त्यांच्या राहण्याच्या ठिकाणाहून बाहेर पडू शकतात आणि मोठ्या शहरांमध्ये चांगल्या संधी शोधू शकतात.

**उपाययोजना**

1. ग्रामीण भागात चांगल्या आरोग्य सोयीसुविधा मिळाल्या पाहिजे
2. रोजगार मिळाला पाहिजेत
3. गावात सामाजिक सलोखा असला
4. गावात लहान उद्योग सुरू झाले पाहिजे

अशा प्रकारे ग्रामीण ते शहरी स्थलांतर म्हणजे चांगल्या संधींच्या शोधात लोकांना एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाणे. शैक्षणिक संस्था, उत्तम आरोग्य सुविधा, वित्तीय संस्था आणि सुधारलेली आर्थिक स्वातंत्र्य यांसारख्या विविध सुविधांमुळे ग्रामीण भागातील लोकांना शहरी भागात जाऊन चांगले जीवन जगण्याची प्रेरणा मिळते. तथापि, हे नेहमीच खरे ठरत नाही. काही लोक शहरात गेल्यानंतरही वाईट परिस्थितीत सापडू शकतात. ग्रामीण भागातून शहरी भागात होणाऱ्या स्थलांतरामुळे होणारी शहरी लोकसंख्या वाढ आणि शहरीकरण यांचा गावांवर आणि शहरांवर दोन्हीवर मोठा परिणाम होऊ शकतो. तरच ग्रामीण भागातील लोक शहरात जाणार नाहीत आणि शहरावर लोकसंख्या वाढीची समस्या येणार नाही.

**संदर्भसूची :**

1. वाघ शैलेश, सोनवणे सिद्धार्थ, (2014),(Edtd)ग्रामीण व नागरी वस्ती भूगोल, अथर्व प्रकाशन, पुणे.
2. गोरे अशोक,(2015)'ग्रामीण व नागरी समाजशास्त्र', विद्या बुक्स, छत्रपती संभाजीनगर.
3. https://vishwakosh.marathi.gov.in.
4. https://en.wikipedia.org.
5. https://www.google.com
6. https://www.google.com

**Publisher's Note:** *The views and opinions expressed in this article are solely those of the author(s) and do not necessarily reflect those of the publisher, editors, or the editorial board.*